**आर बी आय/ २००५-०६/ ४८**
**आर पी सी डी. सीओ. आर एफ. बीसी. क्र. १२/ ०७.३८.०१/ २००५-०६**
जुलै १२, २००५
अध्यक्ष / मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व राज्य व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका

प्रिय महोदय,
**मयत जमा- खातेदारांच्या संबंधित दावे निकालात काढणे-**
**पध्दतींचे सुलभीकरण**

रिझर्व बँकेच्या वार्षिक धोरणाचा मध्यावधि सर्वेक्षण अहवाल दि. नोव्हेंबर ३, २००३ च्या प्रसिध्दीकरणाच्या अनुषंगाने, सर्व साधारण माणसाला दिल्या जाणाऱ्या सार्वजनिक सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी, आर बी आय द्वारा एक समिती - 'प्रोसिजर अँड परफॉर्मन्स ऑडिट ऑन पब्लिक सर्व्हिसेस' (सीपीपीएपीएस) स्थापन करण्यात आली. या समितीचा बँक व्यवहारातील अहवाल क्र. ३. 'व्यक्तींसाठी (अ- व्यापारी) ठेव खाती आणि इतर सुविधा ' यावरुन असे दिसून येते की, विशेषतः मृत ठेवीदारांच्या कुटुंबाला लागु असलेल्या कटकटींच्या रीतींमुळे अशा कुटुंबांना बराच त्रास होत आहे. आमची परिपत्रके, आर पी सी डी. सीओ. क्र. आर एफ.बीसी ०९/०७.३८.०१/ २०००-०१ दिनांक ऑगस्ट २२, २००० आणि आर पी सी डी. सीओ. क्र. आर एफ. बीसी. ५९/ ०७.२८.०१/२०००-०१ दिनांक फेब्रुवारी २७, २००१ यांच्याद्वारे मृत ठेवीदारांसंबंधीचे दावे निकालात काढण्यासंबंधी निदेश बँकांना दिले गेले होते तरी, दाव्यांवरील प्रचलित कारवाईचे अवलोकन केल्यावर, सी पी पी एपी एस च्या शिफारशीनुसार, या विषयावरील आधीचे सर्व निदेश रद्दबातल ठरवून, मृत ठेवीदारांच्या दावे जलद, विनात्रास निकालात काढण्यासाठी, पुढील निदेश देण्यात येत आहे.

**<u>२. ठेव-खात्यात प्रवेश/ हक्क</u>**
**<u>अ) जिवित/ नामनिर्देशित व्यक्ती हे कलम असलेली खाती</u>**

२.१) आपणास माहितच आहे की, ठेवी - खात्यांच्या बाबतीत, जेथे ठेवीदाराने नामनिर्देशनाची सुविधा वापरुन वैध नामनिर्देशन केले असेल किंवा जेथे जीवित व्यक्ति कलम ( म्हणजे 'दोघांपैकी एक किंवा जीवित' किंवा 'कोणीहि किंवा जीवित' किंवा ' पूर्वीचा किंवा जीवित' किंवा ' दुसरा किंवा जीवित') वापरुन खाते उघड्ले असेल. तेथे, त्या मृत व्यक्तीच्या ठेव खात्यातील शिल्लक रकमेचे, जीवित / नामनिर्देशित व्यक्तीला ( व्यक्तींना) प्रदान करणे हे बँकेच्या दायित्वानुसार वैध कर्तव्य ठरते. मात्र -
अ) योग्य अशा कागदोपत्री पुराव्यावरून ठेवीदाराचा मृत्यु झाला असल्याची खात्री करुन घेऊन जीवित/ नामनिर्देशित व्यक्तींची ओळख पटवून घेण्यात योग्य ती काळजी व सावधगिरी बँकेने घेतली असल्यास

ब) मृत व्यक्तीच्या खात्यामधून प्रदान करण्यास बँकेला प्रतिबंध करणारा, सक्षम अशा न्यायालयाचा आदेश नसल्यास.

क) जीवित व्यक्तीला /( व्यक्तींना / नामर्देशिताला, बँकेकडून दिल्या जाणाऱ्या प्रदानाचे, ते मृत ठेवीदाराच्या कायदेशीर वाटसांचे केवळ विश्वस्त आहेत असे स्पष्टपणे सांगितल्यास; म्हणजे केलेल्या अशा प्रदानामुळे, ज्यांना ते प्रदान केले गेले आहे त्या जीवित व्यक्तीं/ नामनिर्देशित व्यक्तींच्या विरुध्द असलेला कोणाचाही हक्क डावलला जाणार नाही.

२.२) येथे कृपया नमूद करावे की, वरील अटी पाळून बँकेने जीवित व्यक्ती / नामनिर्देशित व्यक्तींना प्रदान केले असल्यास बँकेवरील जबाबदारी जरी संपत असली तरी कायदेशीर दावा / प्रतिनिधीत्वाच्या बँकेने आग्रह धरणे हे अनावश्यक व असमर्थनीय आहे; व त्यामुळे जीवित व्यक्तींना नामनिर्देशित व्यक्तींना होणारी व टाळता येण्याजोगी असुविधा होऊन गंभीर अशी पर्यवेक्षीय नापसंती निर्माण होईल. म्हणून अशा बाबतीत, जीवित/ नामनिर्देशित व्यक्तींना प्रदान करते वेळी त्यांनी वारसा-प्रमाणपत्र, प्रशासकीय पत्र किंवा प्रोबेट सादर करण्याचा आग्रह बँकांनी धरु नये. किंवा मृत खातेदाराच्या खात्यात कितीही रक्कम असली तरी जीवित/ नामनिर्देशित व्यक्तींकडून हानि - संरक्षणपत्र, किंवा हमी मागण्यात येऊ नये.

ब) जीवित/ नामनिर्देशित व्यक्ती हे कलम नसलेली खाती

२.३) 'कोणीही एक किंवा जीवित' सोडून ( केवळ एकाने किंवा संयुक्तपणे चालविण्याचे खाते) जेथे मृत ठेवीदाराने त्याखात्यासाठी कोणतेही नामनिर्देशन केले नसेल तेथे, बँकांना सांगण्यात येते की, सामान्य माणसाला त्रास / असुविधा होऊ नये म्हणून, खातेदाराच्या कायदेशीर वारसाला/वारसांना प्रदान करण्यासाठी सुलभ रीत वापरावी. या संदर्भात, जोखीम व्यवस्थापन प्रणाली लक्षात घेऊन, मृत ठेवीदारांच्या खात्यात विशिष्ट किमान मर्यादेची रक्कम ठेवून, केवळ एका हानि - संरक्षणपत्राशिवाय अन्य कोणत्याही कागदपत्रांची मागणी न करता, उरलेल्या रकमेपर्यंतचे हक्क/ दावे बँकांनी निकालात काढावे.

## (३) मुदत - ठेवीची खाती मुदतपूर्व बंद करणे

मुदतठेवींच्या बाबतीत, बँकांना सांगण्यात येते की, त्यांनी खाते उघडण्याच्या फॉर्ममध्येच, ठेवीदारचा मृत्यु झाल्यास त्या ठेवीचे खाते मुदतपूर्व बंद करता येईल असे कलम घालावे. असे मुदतपूर्व खाते बंद करून त्यातील निकासीसाठी असलेल्या अटी व शर्ती फॉर्मवरच दिलेल्या असाव्यात. अशा वेळी खाते मुदतपूर्व बंद केले गेल्यास त्यावर दंडात्मक आकार लावला जाणार नाही.

## (४) मृत ठेवीदाराच्या नावे जमा होणाऱ्या रकमेवरील कार्यवाही

अशा ठेव खात्याच्या जीवित/ नामनिर्देशित व्यक्तींना होणारा त्रास टाळण्यासाठी, बँकांनी, अशा जीवित/ नामनिर्देशित व्यक्तींकडून, मृत खातेदाराच्या नावे पुढेही येणाऱ्या रकमांबाबत, योग्य असा करार/ अधिकारपत्र घ्यावे. याबाबतीत बँकांनी पुढील दोन पर्यायांमधून एकाची निवड करावी :-

- मृत खातेदाराच्या जीवित / नामनिर्देशित व्यक्तींकडून बँकेने अधिकारपत्र घेऊन 'मृत श्री.....यांची मालमत्ता' असे खाते उघडून, त्यात मृत खातेदाराच्या नावे येणाऱ्या रकमा जमा केल्या जाव्यात. मात्र त्यातून निकासी होऊ देऊ नयेत.

किंवा

जीवित / नामनिर्देशित व्यक्तींनी बँकेला अधिकारपत्र देऊन, अशा येणाऱ्या रकमा 'खातेदार मृत ' अशा शेऱ्यासह, त्या रकमा पाठविणारांना परत कराव्यात. जीवित/ नामनिर्देशित व्यक्ती/ कायदेशीर वारस, यानंतर रक्कम पाठविणारांना पराक्रम्य दस्तऐवज (निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ) देऊन प्रदान मिळवू शकतील.

**(५) सुरक्षित जमा कक्ष / सुरक्षित जमा ऐवज मिळविण्यासाठी**
सेफ कस्टडी ऐवजाचा लॉकर घेणारा / ठेवीदाराच्या नामनिर्देशित व्यक्तीने / व्यक्तींनी (असे नामनिर्देशित केले असल्यास ) किंवा मृत व्यक्तीच्या मागील जीवित व्यक्तीने / व्यक्तींनी (जीवितव्यक्तीबाबत कलमात लॉकर / सेफ कस्टडी ऐवज निर्देशित केलेला असल्यास), लॉकर घेणारा/ ठेवीदाराचा मृत्यु झाल्यास, त्यामधील ऐवज मिळावा अशी विनंती केल्यास, बँकांनी ठेवींखात्यांसाठी आवश्यक ते बदल / फेरफार केल्यानंतर (म्युटाटिस म्युटांडिस ) सर्वसाधारणतः वरील रीत अनुसरावी तथापि या संबंधात सविस्तर मार्गदर्शक तत्वे वेगळी देण्यात येत आहेत.

**(६) दावे निकालात काढण्यासाठी कालमर्यादा**
बँकांना सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी मृत ठेवीदारांच्या बाबतचे दावे, त्याबाबतच्या हक्क / दावा मिळाल्यानंतर १५ दिवसांच्या आत निकाली काढून जीवित / नामनिर्देशित व्यक्तीला/ व्यक्तींना प्रदान करावे, मात्र, त्याआधी ठेवीदार मृत झाल्याचा दाखला, आणि बँकेला समाधानकारक असे, अशा दाव्यांचे/ हक्कांचे ओळख पठविणारे पुरावे मिळावे असावेत.

बँकांनी त्यांच्या संचालक मंडळाला, योग्य कालावधीने, धर्तीवर मृत ठेवीदार / लॉकर्स भाडेकरू / सुरक्षित जमा ऐवज खातेधारक यांच्या संदर्भात आलेल्या दाव्यांची कालमर्यादेबाहेर प्रलंबित राहिलेल्या दाव्यांची संख्या कारणांसहित द्यावी.

**(७) बँकव्यवहार विनियम अधिनियम, १९४९**
या संदर्भात, आपले लक्ष, बँकव्यवहार विनियम अधिनियम, १९४९(सहकारी सोसायट्यांना लागू असलेल्या ) च्या कलम ४५ झेड ए ते कलम ४५ झेड एफ मधील तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

**(८) सुलभीकृत कार्यकारी प्रणाली/ कार्यपध्दती**
निरनिराळ्या  परिस्थितीतून निर्माण झालेल्या, मृत खातेदारांच्या दाव्यांच्या तडजोडी बाबतची, या परिपत्रकातील मजकुराशी सहमत असलेली व बँकांद्वारे स्वीकारण्यासाठी अशी एक 'नमुनेदार कार्यकारी प्रणालि' (एम ओ पी) तयार करण्यास नाबार्डला सांगण्यात आले होते. यासाठी बँकांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या मृत घटकांच्या ( ठेवीदार / लॉकरचे भाडेकरू / सुरक्षाजमा ऐवजाचे ठेवीदार) दाव्यांच्या तडजोडीसाठी असलेल्या, अस्तित्वात असलेल्या प्रणाली व कार्यरीतींचे अवलोकन करुन, या कामासाठी, त्यांच्या मंडळाच्या संमतीने आणि लागू असणाऱ्या कालाच्या तरतुदी तसेच वरील निदेश आणि नाबार्डने तयार केलेला एम ओ पी लक्षात घेऊन, त्यांच्या कार्यपध्दती / धोरणे यांचे सुलभीकरण करावे.

**(९) ग्राहक मार्गदर्शन व प्रसिध्दी**

नामनिर्देशनाची सुविधा आणि जीवित / पर्यायी खातेदाराचे कलम यामुळे पुढे होणाऱ्या फायद्याबाबत, बँकांनी ग्राहकांना मार्गदर्शन करावे तसेच भरपूर प्रसिध्दीही द्यावी. उदाहरणार्थ, त्यांनी त्यांच्या प्रसिध्दीपत्रकात ठळकपणे प्रसिध्द करावे की, संयुक्त जमा खात्यातील एका खातेदाराचा मृत्यु झाल्यास त्या खात्यातील रक्कम त्या संयुक्त खात्याच्या जीवित खातेदाराला, तसे जीवित पर्यायाचे कलम (सर्व्हायव्हर क्लॉज) असल्यासच मिळू शकते.

(१०) मृत ठेवीदारांच्या, जीवित / नामनिर्देशित व्यक्ती / व्यक्तींना चांगली ग्राहक सेवा देण्यात लक्षणीय सुधारणा करण्यासाठी या निदेशांकडे गंभीरतेने लक्ष देण्यात यावे.

(११) कृपया आमच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाला पोच द्यावी.

**आपला विश्वासू**
**(सी एस मूर्ती)**
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक